महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२३ वा | दिनांक : ३०/०६/२०२५ | वार : सोमवार

# हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन जीआर रद्द



**मुंबई** : पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महायुती सरकारने पत्रकार परिषद घेत हिंदी भाषेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन जीआर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नरेंद्र जाधव यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून या समितीच्या अहवालानंतरच पुढील निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. महायुतीचे हे चौथे अधिवेशन आहे. बहुतांश भागांमध्ये पाऊस आहे, काही ठिकाणी अतिवृष्टी आहे. काही ठिकाणी पाऊस कमी आहे. सरकारचे निर्णय देखील अतिशय चांगल्या पद्धतीने घेतले जात आहेत. खतांच्या काही तक्रारी आल्या आहेत त्यावर देखील काम केले जात आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, विरोधी पक्षाला आम्ही चहापानाला बोलावले होते, परंतु नेहमीप्रमाणे विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. यावेळी त्यांनी एक भलेमोठे पत्र दिले आहे. पत्र मोठे असले तरी मजकूर मोठा नाही. गेल्यावेळी जे मुद्दे घेतले होते तेच पुन्हा टाकून दिले आहे. मराठीचा जो विषय आहे अतिशय गंभीर मुद्दा असला तरी त्यांच्या पत्रात २४ व्याकरणाच्या चुका दिसून आल्या. उबाठाच्या ३ सह्या आहेत, शरद पवार गटाच्या २ सह्या बघायला मिळाले. भास्कर जाधव यांची यावेळी सही दिसलेली नाही.

आज वडेट्टीवार पत्रकार परिषदेत म्हणाले की अनेक कामांना स्थिगी मिळाली आहे. त्यांना अजूनही उद्धव ठाकरेच मुख्यमंत्री असल्याचे वाटत आहे. आज आपण सगळे लोक या ठिकाणी हिंदीचा जो विषय आहे, आमच्यासाठी मराठीचा विषय आहे. आम्ही मराठी भाषेची सक्ती महाराष्ट्रात केली आहे. पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना उठवता येत नाही. २१ सप्टेंबर २०२० रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हे शैक्षणिक धोरण कसे लावायचे यासाठी समिती नेमली होती. १६ ऑक्टोबर २०२० साली जीआर निघाला आणि अतिशय नामवंत असे शास्त्रज्ञ व अभ्यासक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ तज्ञ लोकांची समिती गठित केली होती. सर्वच मंडळी नामवंत होती. अशा लोकांची चांगली समिती केली होती. १४ सप्टेंबर रोजी या समितीने १०१ पानांचा एक अहवाल उद्धव ठाकरे यांच्याकडे सादर केला. या अहवालात काय म्हटले होते, तर या अहवालाच्या ८ व्या प्रकरणात भाषेचा मुद्दा आलेला आहे. उबाठा गटाचे उपनेते डॉ. सुखदेव थोरात, कोटापल्ले आणि उबाठाचे विजय कदम भाषेच्या मुद्यात होते. इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिलीपासून शिकवावी. अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी तयार होतील. पण त्याचवेळी इंग्रजी आणि हिंदी पहिलीपासून सक्तीची करण्यात यावी, असे यात म्हटले होते. याचा अर्थ हिंदी सक्तीची अंमलबजावणी उद्धव ठाकरेंनी केली होती.

यात कुठेही हा अहवाल स्वीकारताना त्रिभाषा सूत्रे बाजूला ठेवा वगैरे असे काहीच म्हटले नाही. अॅकडमिक बँक ऑफ क्रेडिटमध्ये मार्क मिळतील म्हणून तिसरी भाषा करण्यात आली होती. माशेलकर समितीचा अहवाल आणि निर्णय यावर कॅबिनेट बैठक घेऊन मान्यता देण्यात आली होती. जे आमच्या काळात जीआर निघाले आहेत ते याच सगळ्यावर काम करत निघाले आहेत. १६ एप्रिल २०२५ ला आम्ही पहिला जीआर काढला. यात आम्ही असे म्हंटले की मराठी भाषा सक्तीची आहे, दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी भाषा हिंदी म्हटली. परंतु यावर अनेकांनी प्रश्न उपस्थित केला आणि १७ एप्रिल रोजी आम्ही हा निर्णय बदलला आणि तिसरी भाषा म्हणून कोणतीही भारतीय भाषा शिकता येईल असा जीआर काढला. तिसरी भाषा पहिलीपासून नाही. सक्तीची केलेली हिंदी यावर पर्याय देण्याचे काम आमच्या सरकारने केले आहे.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा आधार देत सांगितले की आपली मातृभाषा शिकलीच पाहिजे पण हिंदी देखील आपण शिकली पाहिजे हे आंबेडकरांनी सांगितले आहे. या मंत्रिमंडळात त्यावेळची संपूर्ण शिवसेना होती, शरद पवारांचा पक्ष होता आणि कॉंग्रेस देखील होती. सत्तेतून बाहेर आले की वेगळे बोलायचे आणि सत्तेत असले की वेगळे बोलायचे. ही जी पद्धत आहे, यात केवळ विरोधाला विरोध असे दिसत आहे.

राज ठाकरेंनी पहिला प्रश्न उद्धव ठाकरेंना विचारले पाहिजे की तुम्हीच मान्यता दिली होती तर कुठल्या तोंडाने मोर्चा काढायला निघलात. आम्ही त्या दिवशी देखील सांगितले होते की दादा भुसे सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेतील आणि वस्तुस्थिती ठेवतील. कारण तिसरी भाषा शिकलो नाही तर मराठी मुलांना तिथे मार्क मिळणार नाही. इतर माध्यमातले जे मुले आहेत त्यांना हिंदी आणि इंग्रजी अनिवार्य आहेच, याचा फायदा त्यांना बँक क्रेडिटमध्ये मिळणार.

आजच्या मंत्रिमंडळात आम्ही यावर चर्चा केली आणि असा निर्णय घेतला, तिसरी भाषा कोणती असावी कुठल्या इयत्तेपासून असावी यासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांचा अहवाल आल्यावरच निर्णय घेतला जाईल. आम्ही सध्या घेतलेला निर्णय रद्द करत आहोत.

विधिमंडळाच्या 'पावसाळी अधिवेशन-2025'च्या पूर्वसंध्येला प्रथेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहभागी होत मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांच्या साथीने चहापानाचा आस्वाद घेतला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री आशिष शेलार, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री अतुल सावे आणि इतर सहकारी आमदार उपस्थित होते.

# ठाकरे एकत्र येणार याचा धसका घेतला : संजय राऊत

**मुंबई** : हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय महायुतीसरकारने रद्द केले आहेत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार देखील उपस्थित होते. आता यावरून विरोधकांनी प्रतिक्रिया देणे सुरू केले असून ठाकरे एकत्र येणार याचा धसका घेतला, अशी टीका खासदार संजय राऊत यांनी केली आहे. तसेच सुषमा अंधारे यांनी देखील मुख्यमंत्र्यांवर हल्लाबोल केला आहे.

भाजपचा स्थायीभाव आहे खोटे बोलायचे आणि रेटून बोलायचे. पण भाजपचा हा स्थायीभाव एकनाथ शिंदे यांच्याकडे पण आला आहे का असे वाटायला लागले आहे. कालपर्यंतच यांची मंडळी म्हणत होती की हिंदीची सक्ती नसल्याचे म्हणत होते. कालपर्यंत नाही म्हणणारी माणसे जर ती गोष्टच नव्हती तर आज काय रद्द केले आहे यांनी? असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. तसेच मुख्यमंत्री कालपर्यंत खोटं बोलत होते, असा आरोपही अंधारे यांनी केला आहे.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, जेव्हा तोंडघशी तेव्हा मात्र बोलतानाचा माइक एकनाथ शिंदे यांच्याकडे किंवा अजितदादांकडे देऊन आपण कसे वेगळे आहोत हे दाखवून देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री करत आहेत. आज हा जीआर रद्द करण्याचा निर्णय घेऊन मुख्यमंत्रीच जास्त तोंडघशी पडले आहेत.

मोर्चा काढला तरी आपल्याला काही फरक पडत नाही असे दाखवत होते आणि कालपर्यंत बेडूक फुगवण्याचा प्रयत्न करत होते. परंतु कितीही बेडूक फुगवले तरी त्याचा बैल होत नाही, असे सुषमा अंधारे म्हणाल्या. आम्ही नुसता मोर्चा काढायचा म्हणला तर तिघांना एकत्र यावे लागते. यात मी आज अजितदादांना सूट देते कारण त्यांनी अगदी स्पष्ट भूमिका मांडली होती की होय, चौथीपर्यंत मराठीच असली पाहिजे आणि हिंदी पाचवीपासून बघूया. परंतु देवेंद्र फडणवीस किती खोटे बोलू शकतात आणि त्यांचा खोटारडेपणा त्यांचे चेहऱ्यावरून ओसंडून वाहत आहे.

जीआर रद्द केला पण मला आधी त्यांच्याकडून हे उत्तर हवे आहे की जर सक्ती नव्हती तर आज काय रद्द केले आहे? असा प्रश्न सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. आता ५ तारखेच्या मोर्चाबद्दल बोलायचे झाले तर हा कुठल्या पक्षाचा मोर्चा नाही. राजकारणाच्या पलीकडे जाऊन जे मराठीवर प्रेम करतात त्यांनी मोर्चा काढायचा ठरवले आहे. आणि हा जो निर्णय रद्द केला आहे यात महाराष्ट्रातील मराठी माणसाचे यश आहे. आज देवेंद्रजी तोंडावर पडले आहेत. त्यांनी पाळलेली सगळीच पिलावळं तोंडघशी पडले आहेत.

आता समिती स्थापन करणार आहेत, हे मुख्यमंत्र्यांना आधी का सुचले नाही. मुख्यमंत्री स्वतःला फार विद्वान समजतात. आता त्यांच्या पायाखालची वाळू सरकत आहे. मराठीच्या मुद्यासाठी सगळे विरोधी पक्ष एकत्र आले तर काय होईल, अशी भीती त्यांना वाटली. म्हणजे केवढा छद्मीपणा, केवढा कपटीपणा यांच्यात रूजला आहे, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली.

संजय राऊत यांनी ट्विट करत महायुतीवर टीका केली आहे. ते म्हणाले, हिंदी सक्तीचा सरकारी आदेश रद्द! हा मराठी एकजुटीचा विजय, ठाकरे एकत्र येणार याचा धसका, ५ जुलैचा एकत्रीत मोर्चा आता निघणार नाही; पण..ठाकरे हाच ब्रँड! (फडणवीस यांनी घेतलेला शहाणपणाचा निर्णय.छान), असे ट्विट करत खासदार संजय राऊत यांनी महायुतीवर टीका केली आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० जून २०२५

# कन्या विद्यालयात मुलींना मोफत बस पासचे वाटप




**कन्नड (अरुण थोरात):** राज्य परिवहन महामंडळ मार्फत राबवल्या जाणाऱ्या 'अहिल्यादेवी होळकर मोफत पास योजनेतून'शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींना दि. 28 जून रोजी मोफत पासचे वितरण करण्यात आले.यावेळी 'एक पेड मा के नाम 'अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

राज्य परिवहन महामंडळाचे सहाय्यक वाहतूक अधीक्षक संघर्ष पवार, वाहतूक विभागाचे जेई अनिल भिंगारे, वाहतूक नियंत्रक गणेश खंडागळे यांनी मुलींना मोफत पासचे वितरण केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका सुनीता दळवी, सुभाष गोरे, जयश्री सोनार, विजय भोसले, मोफत पास योजनेचे विभाग प्रमुख व इको क्लब प्रमुख पुरुषोत्तम बागुल, हरिचंद्र शेवरे सह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. गणेश विसपुते यांनी सूत्रसंचलन करून आभार मानले.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# मातीनं तारलं..

मातीत जन्मलो ! मातीत बसलो!
मातीचाच झालो! जन्मोजन्मी!!

मातीची ही काया! मातीचाच रंग!
मातीतच दंग! युगयुगे !!

मातीनंच दिली! पोटास भाकर!
म्हणून साखर! जीव झाला!!

मातीची ही माया! सांगू किती थोर!
काळजात घोर! लेकासाठी!!

मायबाप आता! जाता देवाघरी !
शोधतो पंढरी! मातीत या!!

वनवासी जीणं ! नियतीनं दिलं!
मातीनं तारलं ! जीवनास!!

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**

# दौलताबाद बस स्टँड जवळ काही काळ ट्राफिक जाम




**दौलताबाद :** रविवार असल्याने पर्यटक पर्यटनासाठी दौलताबाद, खुलताबाद, वेरूळ, म्हैसमाळ कडे पर्यटनासाठी जात असताना दौलताबाद बस स्टँड जवळ काही काळ ट्राफिक जाम असल्याने पर्यटकांना त्रास सहन करावा लागला

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० जून २०२५


## कन्नड तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक पदी राजकुमार गंगवाल



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक पदी राजकुमार गंगवाल यांचा सत्कार करताना तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रवीण शिंदे व वासडी गावचे माजी सरपंच राहुल कुमार पाटणी.

## हिंदी सक्तीच्या निर्णयाला शिंदेंच्या मंत्र्यांचाही विरोध

**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिल्यापासून हिंदी भाषा सक्तीने शिकवण्याच्या शासन निर्णयावर आता केवळ विरोधकच नव्हे, तर पक्षांतील काही मंत्रीही नाराज असल्याचे समोर आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील काही मंत्र्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. त्यामुळे राज्य सरकार लवकरच हिंदी सक्तीच्या निर्णयाला स्थगिती देण्याचा निर्णय घेऊ शकते, अशी माहिती मिळत आहे.

शालेय शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने शिकवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाला राज्यभरातून प्रचंड विरोध होत आहे. शिवसेना ठाकरे गट, मनसे, काँग्रेससह अनेक साहित्यिक, अभ्यासक आणि सामाजिक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

येत्या ३० जून रोजीपासून पावसाळी अधिवेशन चालू होणार आहे. त्याआधी सह्याद्री अतिथीगृहावर मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या अधिवेशनात हिंदी सक्तीवरून विरोधक सत्ताधाऱ्यांना घेरण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, हा वाद चिघळण्याआधीच सरकारने पावले उचलण्याचे संकेत मिळत असून, काल रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात यासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती आहे.

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतही हिंदी सक्तीच्या निर्णयावर चर्चा झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने हिंदी भाषेबाबतच्या सरकारच्या निर्णयाला विरोध दर्शवलाय. हिंदी भाषेला शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांचा देखील विरोध असल्याचे समोर आले आहे. सरकारने निर्णय मागे घेतला नाही तर शिवसेना मंत्री देखील आक्रमक होणार असल्याचे बोलले जात आहे. यानंतर आता सरकार या निर्णयाला तात्पुरती स्थगिती देण्याचा विचार करत आहे, अशी चर्चा सुरू आहे.

एकीकडे एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही आता विरोधात असल्याचे समोर येते आहे. तर दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी देखील सरकारच्या या निर्णयामुळे खूश नसल्याचे चित्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाचवीनंतर विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकवण्यात यावी, अशी भूमिका मांडली आहे. शिवाय ठाकरे बंधूंचा मोर्चा निघणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करतोय, असेही अजित पवार यांनी म्हटले होते.






## इतके नालायक सरकार महाराष्ट्रात कधीच झाले नाहीत



**मुंबई :** शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते, आता मात्र समित्या बसवून वेळकाढूपणा सुरू आहे. ज्याच्या श्रमावर आपण पोट भरतो, त्या बळीराजालाच सरकारचे लोक 'तुला अंगावर घालायला कपडे, चपला आम्ही दिल्या, अशा प्रकारची भाषा माजी मंत्री असलेल्या लोणीकरांकडून वापरण्यात आली.

अशा मनोवृत्तीच्या विकृत मनोवृत्ती असणाऱ्या सरकारच्या चहापानाच्या कार्यक्रमाला जाणार नाही, असे म्हणत विजय वडेट्टीवार यांनी संताप व्यक्त केला.

महाराष्ट्रात अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर झाला. या शेतकऱ्यांचा प्रचंड नुकसान झाले. दोन वर्षांपासून शेतकऱ्याला एक रुपयाही सरकारकडून मिळालेला नाही.

या नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीचे पैसे त्याला मिळत नाहीत. अशा सरकारच्या चहा पाण्याला का जायचे आम्ही? असा सवालही विजय वडेट्टीवार यांनी केला.

ते पुढे म्हणाले, यांना न महिलांचे संरक्षण करता येते, ना कायदा सुव्यवस्था हाताळता येते. कायदा सुव्यवस्था पूर्णतः उध्वस्त झाला आहे. रोज खून होत आहेत. बलात्कार होत आहेत. कायद्याचा, पोलिसांचा कोणताही धाक राहिला नाही.

पोलिस महिला अधिकारी सुद्धा सत्ताधाऱ्यांच्या पुढे सुरक्षित नाहीत. त्यांचाही विनयभंग केला जातो. किती हिम्मत या सगळ्यांची केली आहे. त्यामुळे सरकारच्या चहापानावर आम्ही बहिष्कार टाकायचं ठरवले आहे. इतके नालायक सरकार महाराष्ट्राच्या इतिहासात झाले नाही .

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० जून २०२५

# ५०० युनिट पर्यंत मोफत वीज देऊन टीओडी मीटर कायम स्वरुपी रद्द करा : राजेंद्र दाते पाटील



नुकतेच राज्य शासनाने विविध हवाले देत वीज दराची " चतुर " पद्धतीने मांडणी करून स्वतःचे मोठे पण दाखवण्याचा प्रयत्न सर्व सामान्य जनतेच्या लक्षात आला असुन १०० युनिट ची चतुर खेळी केली असुन ५०० युनिट पर्यंत वीज मोफत देऊन टीओडी मीटर कायम स्वरुपी रद्द करावे अशी जोरदार जनहिताची मागणी- शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील मुख्यमंत्र्याकडे केली आहे.

पुढे निवेदनात ते म्हणतात की,अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर टीओडी मीटर बसवण्याच्या प्रक्रिया साठी आम्ही जनतेच्या वतीने विरोध करत असुन कमी वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी १० टक्के सवलत, स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त १० टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणार असल्याचे त्यांनी नमुद करून जर का हरित ऊर्जा खरेदीतून आगामी ५ वर्षांत वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीज दरात ५०० युनिट पर्यंत सामाईक (युनिफॉर्म) उपाय योजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल त्यांनी शासना समोर उपस्थित करून १०० पासुन ३०० युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत याला कशाचे द्योतक म्हणावे ? ही कोणती माफी आहे ? असा जळजळीत सवाल अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला.

तसेच राज्यात पहिल्यांदाच घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक वीज दर पहिल्या वर्षी १० टक्के आणि पाच वर्षांत २६ टक्के कमी होणार आहेत असे राज्य शासन म्हणत असुन महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने म्हणजे एमईआरसी महावितरणच्या याचिके वर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले १०१ ते ३०० १३.२३ रुपये २०२५- २०२६ मध्ये १३.१७ होतील तर सध्याचे ३०१ ते ५०० युनिट १७.७८ एवढी असून ती २०२५- २०२६ वर्षात १७.५६ एवढी होणार तर ५०० युनिट च्या पुढील सध्या १९.२३ रुपये तर वर्ष २०२५- २०२६ या वर्षात १९.१५ म्हणजे फक्त आठ पेशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब सर्व सामान्य जनतेबाबत शासनाची काय दृष्टी आहे हे अभिप्रेत होते.

महावितरणने वीजदर कमी करण्या साठी याचिका केली. त्यावर एमईआरसीने जो आदेश दिला आहे तो मुळात व्यापक हिताचा ठरतच नसुन सदरच्या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या १०० युनिटच लक्षात घेत औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितले प्रमाणे स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरा साठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये सिद्धच होत नाहीत.

आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला असुन २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार केले.

त्यापैकी २ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्यास पाच वर्षांत ६६ हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही ते म्हणाले. महावितरणने मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंट या खासगी वीजकंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळविण्या साठी आयोगापुढे याचिका सादर केल्या आहेत त्याकाही जनहिता साठी अजिबात नाही असे ही ते म्हणाले.

पुढे अत्यंत मुद्देसुद निवेदन त्यांनी केले असुन आयोगाने २९ मार्च रोजी एक एप्रिल पासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळेबंदातून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महावितरणने केली होती हे कशाच्या बळावर मांडले होते हा देखील अनुत्तरित सवाल आहे.

राज्य शासनाने अधिक जनहिताच्या बाबीवर विचार करून सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी ५०० युनिट पर्यंत वीज मोफत देण्याची भुमिका घ्यावी आणि एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुर्नविचार करावा तसेच खाजगी कंपन्यांची या परवान्यामुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बील वाढ, छुपे दर वाढ होऊन सर्वसामान्य लोकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे.

निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.




